**नि.फौ.प्र.क्र. ३९० /२०२१**
**शासन—वि— सुमन**
**नि.क्र. १६**

सरकार पक्षातर्फे फिर्यादी साक्षीदार क्रमांक १ यांची जबानी :—
मी याव्दारे शपथेवर कथन करतो की —

माझे नांव :— अजित लिंबराज कुटे
वय :— ३६ वर्षे, धंदा :— पोलीस नाईक
राहणार :— अमली पदार्थ विरोधी पथक पिंपरी चिंचवड, पुणे.

**साक्षीदाराची सरतपासणी सरकारतर्फे सरकारी वकील श्री.भुषण पाटील यांचेतर्फे शपथेवर सुरु**

मी मागील ५ वर्षापासुन अमली पदार्थ विरोधी पथक पिंपरी चिंचवड येथे पोलीस नाईक या पदावर कार्यरत आहे. दि. २७.०१.२०२१ रोजी दुपारी ३.००ते ३.३० चे सुमरास मी माझे वरिष्ठ अधिकारी नावे एपीआय महाले, एएसआय शेलार, सुर्यवंशी, पोलीस नाईक यादव मॅडम, शिपाई जंगिलवाड, धस व पोलीस हवादलार दिघे हे गस्त करण्याकरिता खाजगी वाहनाने निगडी येथे गस्त करित होतो. आमचे सोबत आमळी ॲडंटिफीकेशन किट, लॅपटॉप, टॉर्च व इतर साहित्य घेउन निघालो होतो. अंदाजे ३.३० चे सुमारास पेरुची बाग ओटास्कीम निगडी येथे पोहोचलो. त्यावेळेस आम्हाला सुमन खाडे ही १४ नंबर बिलडींग समोरील रोडवर दिसली. तिचे हातात एक काळया रंगाची पिशवी होती. आरोपीने आम्हाला पाहुन हालचाल करण्यास सुरुवात केली. सदरची महिला संशयास्पद अवस्थेत दिसली असल्यामुळे वरिष्ठ महल्ले यांचे आदेशावरुन सदरची महिलाची तिला विचारुन झडती घेण्याबद्दलचे सुचनापत्र दिले. सदरचे सुचनापत्र हे महल्ले साहेब यांनी सही केली होती. सदरचे संमतीपत्रावर दोन पंचाची सही व आरोपीची सही घेण्यात आली होती. त्यानंतर यादव मॅडमने सदर आरोपीची अंगझउती घेतली व सदरची अंगझढतीमध्ये आरोपीच्या ताब्यातुन गांजा मिळाला.

२. मिळालेला गांजा महाले साहेब यांनी दोन पंचासमक्ष जप्ती पंचनामा तयार करुन जप्त केला. आरोपीचे ताब्यात गांजा असल्याचे वास घेउन पडताळणी करण्यात आली होती. त्यानंतर आरोपीला पोलीस स्टेशन येथे नेण्यात आले व घटनेबद्दल मी आरोपी विरोधात तक्रार दिली होती. आरोपीच्या ताब्यातुन पिशवीसहित ५३१ ग्रॅम वजनाचा गांजा मिळुन आला होता. सदरचे पिशवीचे वजन ७१ ग्रॅम होते व त्याप्रमाणे आरोपीच्या ताब्यातुन एकुण ४६०ग्रॅम

गांजा जप्त करण्यात आला होता. सदरचे जप्त गांजामधुन २५ ग्रॅम प्रत्येकी दोन वेगळे सॅम्पल काढण्यात आले होते व सदरचे सॅम्पल सी.ए. करिता पाठविण्यात आले होते. मी आरोपी हिचे विरोधात तक्रार दिली होती. आता मला सदरची तक्रार दाखविण्यात आली. ती तीच असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. सदरची तक्रारीला **निशाणी क्र. पी—१७** देण्यात येतो. आता मला छापिल एफ.आय.आर. दाखविण्यात आली. ती तीच असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. सदरचे एफ.आय.आर. **निशाणी क्र. पी—१८** देण्यात येतो. मी आरोपीला ओळखतो ती आज न्यायालयात हजर आहे. जप्त मुद्देमालाची न्यायालयामार्फत इन्व्हेंटरी करण्यात आली आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीचे वकील श्री. पी. व्ही. गायकवाड यांचेतर्फे शपथेवर सुरु**

**३.** दि. २७.०१.२०२१ रोजी सदरचे आरोपीला सोडुन इतर कोणत्याही लोकांविरुध्द श्री. महाले यांनी कारवाई केली होती याबद्दल मला वैयक्तिक माहिती नाही. घटनास्थळाचे दक्षिणेला बिल्डींग क्र. १४ आहे, उत्तरेला झोपडपट्टी आहे, पुर्व पश्चिम खाजगी रस्ता आहे. घटनेच्या वेळेस मी आरोपीला प्रत्यक्ष पाहिले होते सदरचे आरोपी ही आज न्यायालयात हजर आहे. घटनेच्या वेळेस जेव्हा आम्ही पाहिले तेव्हा ती एकटीच होती. आरोपीचे हातात फक्त एक काळया रंगाची पिशवी होती.

**आरोपीचे वकिलांचे तोंडी विनंतीवरुन साक्षीदार यांचा उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

**उलटतपास तहकुब.**

**फेरतपास नाही.**

**वा.दा.ब.अ.क.केले** | **—समक्ष—**

AL AMOODI ABDUL KHAYYUM — Digitally signed by AL AMOODI ABDUL KHAYYUM Date: 2024.12.02 18:09:32 +0530

AL AMOODI ABDUL KHAYYUM — Digitally signed by AL AMOODI ABDUL KHAYYUM Date: 2024.12.02 18:09:35 +0530

**( अल अमुदी ए. के. )**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
पिंपरी, पुणे.
दि. ०२.१२.२०२४

**( अल अमुदी ए. के. )**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
पिंपरी, पुणे.

**– प्रमाणपत्र –**

मी, प्रमाणित करतो की, सदर पी.डी.एफ.संचिकेच्या मजकुरातील शब्द न शब्द मुळ न्यायनिर्णय/आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नांव : श्रीमती किर्ती उदय पवार

न्यायालयाचे नांव : श्री. अल अमुदी ए . के., न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पिंपरी पुणे.

न्यायनिर्णयाचे /ओदशाचे दिनांक :०२/१२/२०२४.

न्यायीक अधिकाऱ्यांनी सही केल्याचे दिनांक :०२/१२/२०२४.

पी.डी.एफ.फाईल अपलोड केल्याचा दिनांक : ०२/१२/२०२४.

स्वाक्षरीत/–

लघुलेखक(श्रेणी–iii)